MRTP Aasinagar (Kalam-53(1))78

नागपूर महानगर पालिका, नागपूर
आसीनगर झोन क्र. ९

नोटीस क्रमांक - 325/MRTP/PWD/P-6/Z-9

दिनांक :- 17/05/2024

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१) अंतर्गत

## नोटीस

प्रति,

१) श्री. गुरमितसिंग मख्खनसिंग राजखोकर (घरमालक)
२) श्री. बलबिंदरसिंग छडवाल (वाहिवाटदार)
३) श्री. जयंत एकनाथ भिळे (वाहिवाटदार)
रा. कामठी रोड, डि. मार्ट जवळ, आटोमोटिव चौक नागपूर.

ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा "उक्त अधिनियम" असा उल्लेख करण्यात आला आहे) चे कलम २ (१५) सह २ (१९) नुसार नागपूर महानगरपालिकेला स्थानिक प्राधिकरण व नियोजन प्राधिकरण म्हणून प्राधिकृत करण्यात आलेले आहे व उक्त अधिनियमातील कलम १५२ (१) नुसार मा. निगम आयुक्त किंवा त्यांनी प्रत्यायुक्त केलेल्या अधिकारी/अधिकाऱ्यांनी उक्त अधिनियमातील अधिकारांचा वापर करुन प्रभावीपणे अधिनियमाची अमलबजावणी करणे अपेक्षीत आहे. मा. निगम आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांनी उक्त अधिनियमातील कलम १५२ अंतर्गत पारित केलेल्या प्रत्यायोजन आदेश क्र. GAD/13/Del, दि. ०८/११/२००४ द्वारे खालील सही करणाऱ्यांना उक्त अधिनियमातील कलम ५३, ५४, ५५ व १४२ चे अधिकार वापरुन कार्य करण्याकरीता प्राधिकृत केलेले आहे व हा आदेश आज रोजी सुध्दा अस्तित्वात आहे.

ज्याअर्थी नियोजन प्राधिकरण म्हणून दि. **१५.०२.२०२४** ला मौका चौकशी केलेली असता असे निदर्शनास आलेले आहे की, आपण आपल्या मालकीच्या महानगरपालिकेच्या अधिकारक्षेत्रांतर्गत असलेल्या भुखंड/घर क्र. **१५६८/सी**, वार्ड क्र. ......... न.भु.क्र. ४७३, ख.क्र. ........................ मौजा - **नारी**, तह. व तालुका नागपूर जिल्हा, नागपूर वर -

१) उक्त अधिनियमानुसार आवश्यक असलेल्या परवानगी शिवाय.
२) दिलेल्या परवानगीच्या विरुध्द.
३) विकासाची दिलेली परवानगी रद्द केल्यानंतर.
४) सुधारीत परवानगीचा भंग करुन.

अनुसूची मध्ये दर्शविल्याप्रमाणे अनधिकृत व बेकायदेशीर विकास (बांधकाम) सुरु केलेला आहे/हाती घेतलेला आहे/घडवून आणलेला आहे किंवा जमिनीचा वापर बदलविलेला आहे/बदलविण्यास सुरुवात केलेली आहे.

त्याअर्थी आपणांस हा नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून पाच आठवड्याचे कालावधीत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात येत आहे.

१) सदर्हु भुखंडावरील अनुसूची मध्ये नमुद अनधिकृत व बेकायदेशीर बांधकाम पाडावे.
२) सदर्हु जमिनीचा अनधिकृत वापर थांबवावा.

उपरोक्त आदेशाचे पालन विहित कालावधीत न केल्यास उक्त अधिनियमात नमुद कायदेशीर कार्यवाहीस आपण पात्र ठराल तसेच विहित कालावधीनंतर तुमच्या जबाबदारी व खर्चाने वरील आदेशाची अमलबजावणी महापालिकेद्वारे करण्यात येईल व याबाबत संबंधीत पोलीस स्टेशनमध्ये आपल्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

### :अनुसूची:

| माळा | भुखंडाच्या/इमारतीच्या अनधिकृत बांधकाम असलेल्या भागाचे विवरण | अनधिकृत बांधकामाचा मोजम (चौरस मीटरमध्ये) | शेरा |
|---|---|---|---|
| तळमजला | जुने बांधकाम | 12.50 X 6.75 = 84.37 चौ. मी.<br>03.30 X 4.60 = 15.18 चौ. मी. | |

कनिष्ठ अभियंता
प्रभाग क्र. 6....

उप विभागीय अभियंता
आसीनगर झोन क्र. ९

सहाय्यक आयुक्त
आसीनगर झोन क्र. ९

(a) BIUP area = 12.50 ;
6.75 = 84.37 m.
(b) 3.30 × 4.60 = 15.18

